# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक २१

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक ०१/०८/२०२५ सकाळी ११-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति. आयुक्त |
| ३. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ४. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ५. | श्रीमती स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ६. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ७. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ८. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ९. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता बांधकाम |
| १०. | श्री नवनित सोनवणे | कार्य. अभियंता पाणीपुरवठा |
| ११. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र.आरोग्याधिकारी |
| १२. | श्री चंद्रकांत मोरे | लेखा विभाग |
| १३. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १४. | श्री के.डी साबळे | लिपीक आस्थापना विभाग |
| १५. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १६. | श्री चंद्रकांत जाधव | प्र. मलेरीया पर्यवेक्षक |
| १७. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| १८. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १९. | श्री प्रदीप चव्हाण | उप अभियंता, बांधकाम |
| २०. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| २१. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| २२. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| २३. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| २४. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| २५. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| २६. | श्री  संभाजी सुडके | लिपीक शिक्षणमंडळ |
| २७. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |
| २८. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |

मा.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-१७४ प्राण्यांच्या जन्म नियंत्रण ABC (DOG) कार्यक्रमाला बळकटी देण्यासाठी दुसरे नसबंदी केंद्र उभारणी कामी अनुदान मागणी प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपायुक्त ज्या वेळी आपण ABC चालु केले. ग्रामीण भागातुन आपल्याला पत्र येवु लागले की, प्राणी जन्म नियंत्रण आमच्या भागात करावे. त्या अनुषंगाने मा. पालकमंत्री महोदयांनी निर्बीजीकरण कॅपॅसिटी वाढवता येईल का या संदर्भात प्रस्ताव सादर करण्यास सांगीतले. त्याअनुषंगाने वाढीव प्रस्ताव सादर केला आहे. मंजुरी मिळाली तर कॅपॅसिटी वाढवता येईल. जेणेकरुन कमी वेळेत जास्त निर्बीजीकरणाचे काम शक्य होईल. साधारण ४ कोटीपर्यंत प्रस्ताव गेला पाहिजे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आजच्या स्थितीत दिवसाला ५० शस्त्रक्रीया करता येतात. या प्रस्तावास मान्यता व निधी आला तर शस्त्रक्रिया वाढवता येतील. मागणीसाठी प्रस्ताव तयार करावा. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १७४ दिनांक ०१/०८/२०२५**

मागील काही वर्षात धुळे महानगरपालिका कार्यक्षेत्रात मोकाट व भटक्या कुत्र्यांची वाढती लोकसंख्या व त्यांच्या उपद्रवामुळे नागरिक, लहान मुले, वृद्ध, यांना संकेत रहदारीस त्रास वाढला आहे. तसेच कुत्र्यांचे चावा घेण्याच्या केसेस वाढत आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत झालेल्या २० व्या जनगणनेनुसार धुळे मनपा हद्दीतील भटक्या कुत्र्यांची संख्या १९१३९ एवढी आहे.

नागरी शहरी भागात प्रामुख्याने मोकाट कुत्र्यांच्या तक्रारीबाबत ठोस उपाय योजना प्रचलित कायदे व नियमांमुळे मर्यादित व अपुऱ्या पडत आहे.. त्यामुळे केंद्र शासनाच्या नियमानुसार रेबीज आजारामुळे मृत्यू होऊ नये यासाठी मोकाट कुत्र्यांचे रेबीज लसीकरण दरवर्षी करणे आवश्यक आहे. तसेच मोकाट श्वानांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी (निर्बीजीकरण) करणे आवश्यक आहे. जेणेकरून नवीन श्वान जन्मदर रोखणे हा उपाय आहे.

AWBI च्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे वरखेडी रोड येथील सर्वे नं २०७ मध्ये अंदाजे रू ७५ लक्ष खर्चाने ए बी सी केंद्र उभारण्यात आले आहे. उक्त केंद्रामध्ये कुत्र्यांची नसबंदी (शस्त्रक्रीया) आणि रेबीज विरोधी लसीकरण (ए आर व्ही) प्रक्रिया पार पाडल्या जातात. यामध्ये भारतीय प्राणी कल्याण मंडळ (AWBI) ABC नियम २०२३ नुसार दररोज ४५-५० शस्त्रक्रिया केली जातात. शहराच्या हद्दीत भटक्या कुत्र्यांच्या संख्येतील वाढ आणि कुत्र्यांच्या चावण्याच्या घटनांमध्ये वाढ यामुळे ए बी सी कार्यक्रमांचा विस्तार करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांची मागणी होत आहे. महानगरपालिकेच्या आकडेवारीनुसार २०२३-२४ मध्ये कुत्र्यांच्या चावण्याच्या नोंदी २९९८ वरून २०२४-२५ मध्ये ३३५६ पर्यंत वाढल्या आहेत. महानगरपालिकेच्या व जिल्हास्तरीय बैठकांमध्ये हा मुद्दा वारंवार उपस्थित करण्यात आला आहे. भटक्या कुत्र्यांच्या संख्येचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि रेबीज सारख्या सार्वजनिक आरोग्य धोक्यांना तोंड देण्यासाठी वाढीव ए बी सी पायाभूत सुविधांचा विस्तार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तरी नवीन प्रस्तावित ए बी सी सेंटर कुंडाणे रोड ( S T P प्लॉट) येथे उभारणी कामी अंदाजे किंमत रु. १ कोटी ५० लक्ष तसेच निर्बिजीकरण प्रक्रीया व अनुषंगीक बाबींसाठी २ कोटी ५० लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी उक्त खर्चासाठी अनुदान मागणी बाबत जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव पाठविणे कामी मे. महासभेपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार प्राण्यांच्या जन्म नियंत्रण ABC (DOG) कार्यक्रमाला बळकटी देण्यासाठी दुसरे नसबंदी केंद्र उभारणी कामी अनुदान मागणी प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करणेकामी मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१७५ स्वातंत्र्य वीर सावरकर पुतळा विकसित करणेकामी सदर पुतळा तात्पुरत्या काळासाठी स्थलांतरित करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता याबाबत पुतळयाचे चबुतऱ्याचे बाजुचे बांधकाम निष्कासीत करुन नव्याने सुशोभिकरणाचे काम सुरु होते. पुतळयाचे जुन्या बांधकामाची दृश्य तपासणी केली असता बांधकाम खराब झाल्याचे निदर्शनास आले आहे. पुतळा सुशोभिकरणाचे बांधकाम पुर्ण होईपावेतो जागेवरुन धुळे मनपा कार्यालयात तात्पुरत्या काळासाठी स्थलांतरीत करणेबाबत पोलिस अधिक्षक यांना कळविण्यात आले आहे. तसेच पुतळा दुरुस्तीसाठी वर्कशॉप येथे नेण्यात येणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक पुतळा स्थलांतरीत करुन घ्या. पुतळयाचे टच अप करुन घ्या. वेळेत तो परत आणुन मनपा आवारात ठेवावा. पुतळयाचे फाऊंडेशन खराब झालेले आहे. तसेच २ महिन्यात पुर्ण काम संपले पाहिजे. कन्सलटंट ने दिलेले रिमार्क कंसिडर करुन चबुतरा पुन्हा उभा करावा. वेळोवेळी संबंधीतांकडे व्हिजीट ठेवा. रस्त्यावरचे काम आहे. २ महिन्यात ते संपले पाहिजे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १७५ दिनांक ०१/०८/२०२५**

धुळे महानगरपालिका निधी अंतर्गत वि.दा.सावरकर पुतळा विकसित करणे कामास मे.महासभा ठराव क्र.२४३ दि.१२/०६/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून जा.क्र./धुमपा/बां.वि./४८७/दि.१४/०३/२०२४ अन्वये मे.रामेश्वर ट्रेडर्स, धुळे यांना रु.९९,९९,८७१/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आला आहे. सद्यस्थितीत अस्तित्वातील पुतळ्याच्या चबुतऱ्याच्या बाजुंचे बांधकाम निष्काशित करून नव्याने सुशोभीकरणाचे काम संबधित ठेकेदारामार्फत सुरु होते.

सद्यस्थितीत सदर ठिकाणी फाऊडेशनचे काम सुरु आहे. उक्त पुतळ्याचे स्ट्रक्चरल ऑडीट श्री.अभय भादलीकर, ए.बी. स्ट्रक्चरल कन्सल्टंट यांना करणेबाबत निर्देश दिले असता श्री.अभय भादलीकर, ए.बी. स्ट्रक्चरल कन्सल्टंट यांनी स्वातंत्र्य वीर वि.दा.सावरकर पुतळ्याचे जुन्या बांधकामाची दृश्य तपासणी केली असता बांधकाम खराब झाल्याचे निर्देशनास आले असून पुतळ्याच्या चबुतऱ्याचे नव्याने बांधकाम करणे आवश्यक आहे. चालू असलेले बांधकाम व अस्तित्वातील आर सी. सी. स्ट्रक्चरची स्थिती यामुळे नागरिकांचा सुरक्षितेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो त्यामुळे याबाबत तातडीने निर्णय घेण्यात यावा असे पत्रान्वये कळविले आहे.तसेच दि.३०/७/२०२५ रोजी म.आयुक्त तथा प्रशासक यांनी समक्ष पाहणी केली असता पुतळ्याचे जुने बांधकाम खराब झाल्याने ते पूर्णपणे निष्कासित करून घेणेसाठी तात्पुरत्या काळासाठी इतर ठिकाणी हलवणेबाबत निर्देश दिले.स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर पुतळा सुशोभीकरणाचे बांधकाम पूर्ण होई तो पावेतो जागेवरून धुळे मनपा कार्यालयात तात्पुरत्या काळासाठी स्थलांतरीत करणेबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./२१६ दि.३/७/२०२५ अन्वये मा.पोलीस अधिक्षक, धुळे यांना कळविण्यात आले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर पुतळा सुशोभीकरणाचे बांधकाम पूर्ण होई तो पावेतो सदर पुतळा तात्पुरत्या काळासाठी आवश्यक ती दुरुस्ती व नुतनीकरण करण्यासाठी शिल्पकार श्री समरद पाटील यांच्या कार्यशाळेत स्थलांतरित करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर चबुतरा व सुशोभिकरणाचे काम २

महिन्यात पूर्ण करण्यात यावे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१७६ स्वच्छ महाराष्ट्र अभियान (2.0)अंतर्गत धुळे शहरातील दैनंदीन संकलन होणाऱ्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्याबाबतच्या सुरु असलेल्या कामास मुदतवाढ कालावधी वाढवणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक मुदतवाढचा कालावधी कधी संपत आहे.

मा.उपायुक्त आपण त्यांना सुरुवातीला १ वर्षाची मुदतवाढ दिली होती. त्यांचा कालावधी सप्टेंबरला संपत आहे. आपण त्यांना २ वर्षाची मुदतवाढ ही दिलेली आहे. आता जे नविन टेंडर दिलेले आहे. मशिन इन्स्टॉलेशन साठी त्याची मशिनरी त्यांनी स्वत: आणुन टाकली आहे व स्वच्छ भारत मिशनकडुन मशिनरी उपलब्ध झाली आहे. लेआऊट झाले आहे. त्यात आपण थोडेफार चेंजेस देखील करणार आहोत. ऑलरेडी आपला वे ब्रीज तेथे आहे. दुसऱ्या वे ब्रीजची गरज नसल्यामुळे त्याऐवजी आपण शेड बनवुन घेत आहोत. त्यात आपले ३० लाखाच्या आसपास सेव्हिंग होत आले. आपले आता सध्या ४ शेड होते. त्यातले २ इंदाई रिसायकलर्स वापरत आहेत. एक शेड रिकामे आहे व एका शेडमध्ये निर्बीजीकरणाचे काम चालु आहे. जे शेड रिकामे आहे त्याला अलाईन एक शेड बांधणार आहेत, जेणेकरुन मशिनरी एकसंध करणे सोपे जाईल. शेड बांधल्यानंतर वापरण्यासाठी देणार आहोत.

मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मुदत सप्टेंबरमध्ये संपणार आहे. टाकलेले कॅपेक्स प्रोसेस होईल या हिशोबाने १ वर्षाची मुदतवाढ देण्यात येत आहे. प्रोव्हिईडेड आता जी मशिनरी इन्स्टॉल होईलती जी ॲडीशनल कॅपॅसिटी राहिल ती देखील त्यालाच रन करावी लागेल. त्यासाठी हे टेंडर केले आहे ते विदाऊट O & M केले आहे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १७६ दिनांक ०१/०८/२०२५**

स्वच्छ भारत अभियान २.० च्या धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत कचऱ्याची योग्य विल्हेवाट आणि प्रक्रियेवर भर देण्यात आला आहे. धुळे महानगरपालिका ड वर्गात येत असुन शहराचे भौगोलीक क्षेत्रफळ १०१.०८ स्क्वेअर कि.मी. आहे. सद्यस्थितीत शहराची लोकसंख्या ५ लक्ष एवढी आहे. आरोग्य विभागामार्फत शहरातील कचरा संकलन बाह्यस्त्रोत मार्फत करण्यात येत असुन सुमारे दररोज १२५ ते १५० मेट्रीक टन कचरा संकलीत केला जात आहे.

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत धुळे शहरातुन दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी सव्हे नं.२०७ येथे नागरी घनकचरा अधिनियम २०१६ ची अंलबजावणी करण्याकामी कचरा प्रकल्प उभारण्यात आला आहे.

मे.स्थायी समिती प्रशासक ठराव क्र.१७८ दिनांक १४/८/२०२४ अन्वये मे.इंदाई रिसायकलर्स एल.एल.पी. यांचे अंदाजपत्रकीय (सादर केलेल्या ) दरास मान्यता दिलेली आहे. जा.क्र./धुमपा/बा.वि./१८२/२०२४ दिनांक ४/९/२०२४ अन्वये मे.इंदाई रिसायकलर्स एल.एल.पी. यांना कामाचे आदेश देण्यात आले आहे.

उक्त आदेशान्वये मे.इंदाई रिसायकलर्स एल.एल.पी. यांनी कार्यआदेशात नमुद केल्याप्रमाणे सर्व्हे नं.२०७ येथे कचरा प्रक्रिया केंद्राच्या शेड १ व २ मध्ये १५० मेट्रीक टन प्रती दिवस प्रक्रिया करण्याच्या क्षमतेचे श्रेडो या नामांकित कंपनीचे मशिनरी बसविण्यात आली आहे सदर मशिनरी उभारणीसाठी मे.इंदाई रिसायकलर्स एल.एल.पी. यांनी रक्कम रुपये ४

कोटी इतक्या रक्कमेची गुंतवणुक स्वखर्चाने केलेली आहे. सदर मशिनरी बसविण्यासाठी २ महिने कालावधी लागला नंतर उक्त मशिनरीसाठी आवश्यक विद्युत पुरवठा उपलब्ध न झाल्याने मे.इंदाई रिसायकलर्स एल.एल.पी. यांनी फेब्रुवारी-२०२५ पासुन शहरातील संकलीत होणाऱ्या दैनंदीन कचऱ्यावर प्रक्रिया केंद्रावर दररोज शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येत आहे.१४ फेब्रुवारी पासुन जनरेटरच्या सहाय्याने प्रकल्प कार्यान्वीत केला असुन इंदाई रिसायकलर्स यांनी आजपावेतो कचऱ्याची प्रक्रिया करुन विल्हेवाट लावलेली आहे.

उक्त प्रमाणे इंदाई रिसायकलर्स यांचे काम समाधानकारक असुन शहरातुन संकलित होणाऱ्या १००% कचऱ्यावर प्रक्रिया करुन शहराची पर्यावरणासाठी आणि सार्वजनिक आरोग्याची काळजी तसेच नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर सुनिश्चीत करण्यास मदत होईल व प्रदुषण कमी होऊन हवा आणि पाण्याची गुणवत्ता सुधारण्यास मदत होते. सदर संस्थेस त्यांच्या मंजुर दरानुसार पुढील २ वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

परंतु सदर संस्थेने सादर केलेल्या पत्रानुसार ५ वर्षाची मुदतवाढ मागीतलेली आहे. इंदाई रिसायकलर्स यांनी उक्त् कामी मोठ्या प्रमाणात प्रकल्प उभारुन अंदाजे रु.५ कोटी इतकी गुंतवणुक केलेली असुन संस्थेली पाच वर्षे कामाची मुदत मिळाल्यास योग्य त्या प्रकारे काम करणे सोयीस्कर होईल व केलेली गुंतवणुक भरण्यास मदत होईल.

त्याअनुषंगाने घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी एक विशिष्ट कालावधी करीता (उदा. ५-१० वर्ष) कंत्राट देणे यामध्ये प्रक्रिया करणे आणि विल्हेवाट लावणे यासारख्या कामांची जबाबदारी सोपविली जाते. तरी उक्त संस्थेस दिर्घकालीन मुदतवाढ देता येवु शकते. तरी मुदतवाढ व प्रशासकीय मान्यता देण्याचा मे.महासभेचा अधिकार असल्याने सदरचा विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (2.0)अंतर्गत धुळे शहरातील दैनंदीन संकलन होणाऱ्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्याबाबतच्या सुरु असलेल्या कामाची गुणवत्ता तसेच संबंधित संस्थेने केलेली गुंतवणुक मुदतवाढ स्वच्छ महाराष्ट्र अभियान (2.0) यातील निकष व कामाची आवश्यकता लक्षात घेता, इंदाई रिसायकलर्स् यांना कार्यादेश पूर्ण होण्याच्या मुदतीनंतर पुढील ३ वर्ष मंजूर दरानुसार मुदतवाढ देण्यास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१७७ — १५० दिवसांच्या मोहिमेच्या अनुषंगाने नवीन महानगरपालिका प्रवेशद्वारा जवळ नागरी सुविधा केंद्र उभारणीकामी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे बाबत आलेलया कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — शासनाच्या १५० दिवसांच्या मोहिमेच्या अनुषंगाने सेवा हक्काच्या सुविधा विविध कालावधीत देणे बंधनकारक आहे. तसेच सदर सेवा हया ऑनलाईन पध्दतीने देण्यात येणार आहे. यात जन्म मृत्यु दाखले, पाणीपटटी, मालमत्ता कर भरणा, विविध दाखले, शासनाच्या विविध योजना व लाभासाठी माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होईल. याबाबत मा. आयुक्त महोदयांनी सुचित केले आहे. त्यानुसार पाहणी करुन सदरचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यासाठी केंद्र उभारणी करीता १० कॉम्प्युटर, प्रिंटर, केबल, स्विचबोर्ड, तसेच इलेक्ट्रीक निगडीत सुविधा पुरविणेसाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरीकामी विषय मे. महासभेपुढे सादर करण्यात आला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — या २ विषय आहे. RTS मधील सेवा त्यासाठी वर्कआऊट करायचे आहे आणि दुसरा ई सेवा केंद्र बाहेर जशी चालतात. तशा स्वरुपाची एक ई सेवा केंद्र मनपांना असले पाहिजे अशा स्वरुपाचा परवा जीआर झाला आहे. त्या जीआर प्रमाणे आपले सरकारचा ID आहे तो ID मिळणेकामी मान्यतेसाठी आपण दिलेले आहे. तो मिळेल मनपाला. त्या सगळयासाठी तेथे २ काऊंटर लागणार आहे. त्यामुळे प्रतिक्षा कक्षापासुन सर्व व्यवस्थित नियोजन करुन घ्या. आर्कीटेक्ट ठाकरे साहेबांना दाखवा त्याचा प्लॅन करुन त्याचे टेंडर करुन घ्या. एस्टीमेट करुन घ्यावे.

मा.उपायुक्त — निधी संदर्भात मागणी केलेली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — आले तर ठिक नाहीतर मनपा निधीतुन मान्यता देता येईल. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १७७ दिनांक ०१/०८/२०२५**

शासनाच्या 150 दिवसांच्या मोहिमेच्या अनुषंगाने सेवा हक्काच्या सुविधा विविध कालावधीत देणे बंधनकारक आहे. सदर सेवा एकाच ठिकाणी केंद्रीकरण करून नागरिकांचा वेळ व त्रास कमी होण्याच्या दृष्टीने नागरी सुविधा केंद्र तात्काळ करणे गरजेचे आहे. तसेच सदर सेवा ह्या ऑनलाईन पद्धतीने देणेत येणार आहे यात जन्म , मृत्यू दाखले , पाणीपट्टी , मालमत्ता कर भरणा , विविध दाखले , शासनाच्या योजना व लाभासाठी अर्ज माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होईल यासाठी नवीन महानगरपालिका येथील प्रवेशद्वारा जवळ नागरी सुविधा केंद्र उभारणे बाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी सूचित केले आहे.

नागरी सुविधा केंद्र उभारणेसाठी 10 कॉम्प्युटर, 10 प्रिंटर , 02 ADF Scanner , केबल, 05 स्विच बोर्ड , 01 बॉक्स RJ-४५ , 3 बंडल , Cat 6 switch wire तसेच इलेट्रिक निगडीत सुविधा पुरविणे आवश्यक आहे.उक्त कामी येणाऱ्या संभाव्य खर्चास मे.महासभेची मंजुरीची आवश्यकता असल्याने मे.महासभेपुढे सादर झालेला आहे. उक्त कार्यालयीन अहवालानुसार, १५० दिवसांच्या मोहिमेच्या अनुषंगाने नवीन महानगरपालिका प्रवेशद्वारा जवळ नागरी सुविधा केंद्र उभारणीकामी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१७८ — धुळे मनपा हद्दीत आरक्षण भूखंड प्लॉट नं. १५३ येथील व्यापारी संकुलातील गाळे त्रिसदस्यीय समिती द्वारे अनामत व भाडे निश्चीत करुन लिलाव पध्दतीने वितरीत करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — धुळे मनपा हददीत आरक्षण भुखंड प्लॉट नं. १५३ दसेरा मैदान येथे व्यापारी संकुल विकसीत करणेकामी धुळे मनपामार्फत प्रथमत: निविदा मागविण्यात आलेली होती. तदनंतर सदरचे काम हे पदाधिकारी यांनी मुलभुत सेवा सुविधा अंतर्गत मंजुर करण्यात आले होते. त्यासाठी साधारणत: ४४.८७ कोटी रुपये खर्च अपेक्षीत आहे. आजपावेतो शासनामार्फत ४.२७ कोटीचा निधी मनपास प्राप्त झाला आहे. शासनाचा निधी अल्प प्रमाणात उपलब्ध झाल्याने याबाबत ई ऑक्शन करुन रेडीरेकनरच्या दरानुसार समिती नेमुन दर निश्चीत करुन लिलाव पध्दतीने गाळे विक्री करण्यास व त्यासाठी स्वतंत्र खाते निर्माण करुन जसे काम पुर्ण होईल त्यानुसार शासनाकडुन निधी मिळाल्यावर आपण त्या खात्याअंतर्गत ठेकेदारांना बिले अदा

करुन न थांबता हे काम पुर्ण करणे योग्य राहिल. ही बाब धोरणात्मक असल्याने सदरचा विषय मे महासभेपुढे सादर करण्यात आला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता जी शासनाची मालमत्ता हस्तांतरणाची समिती फॉर्म झालेली आहे त्याकडे हे सर्व देण्याची व्यवस्था करावी. तसेच यात आरक्षण ठरावावी लागतील ते करुन घ्यावे जेणेकरुन अडचण येणार नाही आणि राहिला निधीचा प्रश्न तर निधी शासनाने दिलेला आहे. त्यामुळे १०० टक्के निधी उपलब्ध होणार आहे. याबाबत स्वतंत्र खाते निर्माण करावे. प्लिंथपर्यंत काम पुर्ण करुन घ्या. मधल्या काळात या फॉर्मालिटीज पुर्ण कराव्या जेणेकरुन अडचण येणार नाही. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १७८ दिनांक ०१/०८/२०२५**

धुळे मनपा हद्दीत आरक्षण भूखंड प्लॉट नं. 153 या जागेवर व्यापारी संकुल विकसित करणे कामी या अगोदर 02 वेळेस BOT तत्वावर निविदा मागविणेत आलेल्या होत्या. परंतु कोणीही त्यास प्रतिसाद न दिल्याने धुळे महानगरपालिकेने स्वतः बांधकाम करणे बाबत निर्णय घेण्यात आला. सध्यस्थितीत पहिल्या टप्प्यात तळ मजला व प्रथम मजल्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. उर्वरित काम टप्या टप्प्याने आर्थिक नियोजना नुसार पूर्ण करण्यात येत आहे.

सदर गाळयापोटी मालमत्ता कर व भाडे यातून मनपास दर वर्षी साधारणतः रु.1.00 कोटी उत्पन्न मिळेल. त्यासाठी सदर व्यापारी संकुल तातडीने विकसन करणे मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. सद्यस्थितीत व्यापारी संकुलाचे 15% ते 20% पावेतो काम झालेले आहे. उर्वरित कामजलद गतीने पूर्णकरणे साठी आर्थिक निधीची उपलब्धता गरजेची आहे.

यासाठी वरील व्यापारी संकुलातील गाळेद्वारे अनामत रक्कम निश्चित करणेसाठी शासनाच्या नियमा नुसार त्रिसदस्य समिती नेमून रेडी रेकनर दरा नुसार अनामत रक्कम निश्चित करून लिलाव पद्धतीने सदर संकुलाचे गाळे विक्री करणेस तसेच सदर कामी स्वतंत्र खाते निर्माण करून प्राप्त होणाऱ्या अनामत रक्कमेतून उर्वरित बांधकाम करणेची बाब धोरणात्मक असल्याने मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, सदर व्यापारी संकुलातील गाळे लिलाव पध्दतीने देण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्टेद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्टयाचे नुतनीकरण) नियम २००३ अन्वये गठित समितीच्या अभिप्राय घेऊन तसेच त्रिसदस्यीय समिती मार्फत बाजारमूल्यानुसार अनामत व भाडे निश्चीती करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच तत्पुर्वी व्यापारी संकुलातील गाळयांची संख्या व शासन निर्णयानुसार देण्यात येणारी आरक्षणे निश्चीत करावी. सदर व्यापारी संकुलाचे काम जोत्यापर्यंत येण्यापूर्वी सदर कार्यवाही पूर्ण करावी. तद्नंतर विहीत नियमानुसार जाहिर लिलाव (E-Auction) पध्दतीने गाळे वितरीत करण्यास व त्यातून मिळणारी अनामत रक्कम स्वतंत्र खात्यात जमा करण्यास व सदर रकमेतून उर्वरीत बांधकाम करण्यास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१७९ पाणीपट्टी विभागातील दुबार बिले व प्रत्यक्ष जागेवर नळ नसलेल्या पाणीपट्टी धारकांची पाणीपट्टी निर्लेखित करणेबाबत आलेलया कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. सदरील विषय १५२ अंतर्गत स्थायी समितीच्या कार्यकक्षेत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक हा विषय पुढील स्थायी समितीपुढे सादर करावा.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १७९ दिनांक ०१/०८/२०२५**

धुळे महानगरपालिकेतील पाणीपट्टी विभागातील ऑनलाईन प्रणालीतील अनेक बिल ही दुबार जनरेट झालेली होती. त्यानुसार वसुली लिपिक यांनी स्थळ पाहणी करून अहवाल सादर केलेला आहे.त्यानुसार त्यांनी प्रत्यक्ष जागेवर पाहणी केल्यानुसार सदर ठिकाणी एकच नळ आढळून आले आहे. त्यानुसार त्यांनी दिलेल्या अहवालानुसार दिनांक.01/04/2025 ते 23/07/2025पाहून 1ते51 दुबारा बिलांची रक्कम 812118/- आहे.

तसेच मनपा पाणीपुरवठा विभागातील फिटर यांच्या अभिप्रायानुसार अस्तित्वात नसलेली 1 ते 72 बिले रक्कम रुपये.930140/- आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम152 नुसार वसूलनहोण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत म.आयुक्तास स्थायी समिती मान्यतेने कोणत्याही करा बद्दल किवा कोणतेही कर वसूल करण्यासाठी झालेले खर्चाबद्दल येणे असलेले जे कोणतेहि रक्कम त्याच्यामध्ये वसूल होणे जोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल असे नमूद आहे.त्यानुसार सदर बिले हि मनपाच्या ऑनलायीन प्रणालीतून रद्द करणेबाबत प्रस्ताव मे. महसभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, अधिनियमानुसार कर निर्लेखित करण्याची बाब मे. स्थायी समितीच्या कार्यकक्षेतील असल्याने सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**